# कार्यकारी सारांश

भारताच्या पश्चिम आणि मध्य भागातील 308 लाख हेक्टर भौगोलिक क्षेत्राने महाराष्ट्र व्यापलेले आहे आणि त्याला अरबी समुद्राजवळ सुमारे 720 किमी लांबीची किनारपट्टी लाभली आहे. राज्यात उष्ण कटिबंधीय मोसमी निम-शुष्क हवामान आहे. राज्यातील सरासरी वार्षिक पर्जन्यवृष्टी 400 ते 6000 मिलीमीटर दरम्यान आहे. राज्यातील जवळजवळ 42.5 टक्के क्षेत्र अवर्षण प्रवण आहे.

राज्यात जल संसाधनांची वार्षिक उपलब्धता अंदाजे 198 अब्ज घनमीटर आहे, ज्यामध्ये 164 अब्ज घनमीटर भूपृष्ठ पाणी आणि 34 अब्ज घनमीटर भूजल आहे. राज्याचे क्षेत्र गोदावरी, कृष्णा, नर्मदा, तापी आणि पश्चिम वाहिनी नदी खोरे या पाच प्रमुख नदी खोऱ्यांमध्ये समाविष्ट आहे. विविध आंतर-राज्यीय नद्यांसंबंधीचे पाणी तंटे, लवादाचे निवाडे/करारनामे आणि पाणी वापरावरील निर्णय यांमुळे राज्याला भूपृष्ठावरील जल संसाधनांच्या वापरास सुमारे 126 अब्ज घनमीटरची मर्यादा असून, त्यापैकी 69 अब्ज घनमीटर (55 टक्के) इतके प्रमाण एकट्या पश्चिम वाहिनी नदी खोऱ्यांचे आहे. सह्याद्री पर्वतरांगा आणि अरबी समुद्र यांच्यामधील 50 किलोमीटरच्या अरुंद पट्टीचा समावेश असलेल्या या प्रदेशाचे लागवडीयोग्य क्षेत्र अत्यंत मर्यादित (10.6 टक्के) आहे. पश्चिमेकडे वाहणाऱ्या नद्यांच्या खोऱ्यात उपलब्ध असलेल्या संपूर्ण पाण्याचा स्थानिकरित्या उपयोग करता येत नाही, तसेच उंच पर्वतरांगामुळे उर्वरित खोऱ्यांपासून वेगळे झाल्याने इतर खोऱ्यातसुद्धा सदर अतिरिक्त पाणी आर्थिकदृष्टयाही वळविता येत नाही. या विपरीत, लागवडीखालील क्षेत्राच्या 89.4 टक्के इतके क्षेत्र असणाऱ्या उर्वरित चार नद्यांच्या खोऱ्यांत एकूण जल संसाधनांपैकी केवळ 45 टक्के जल संसाधने आहेत. या मर्यादांमुळे, राज्याचे सुमारे 42.50 टक्के क्षेत्र तुटीच्या किंवा अती तुटीच्या उप-खोऱ्यांत येते. त्यामुळे भूपृष्ठावरील पाण्याच्या योग्य वापराला राज्यात महत्व आहे. राज्यात राबविण्यात आलेल्या सहा भूपृष्ठीय सिंचन प्रकल्पांमध्ये साध्य झालेल्या परिणामांचे मूल्यांकन करण्यासाठी आयोजित केलेल्या "भूपृष्ठ सिंचनातील परिणाम" या वरील निष्पादन लेखापरीक्षणात खालील बाबी निदर्शनास आल्या:

- सहा पैकी एकाही प्रकल्पाला केंद्रीय जल आयोगाकडून पाण्याची उपलब्धता व आंतर-राज्यीय बाबींबाबत आवश्यक असलेली मंजुरी जलसंपदा विभागाला प्राप्त झालेली नाही.

**(परिच्छेद 2.1.1; पृष्ठ 10)**

- एकही प्रकल्प वेळेत पूर्ण झाला नाही आणि प्रशासकीय मान्यतेतील अनेक सुधारणांमुळे प्रकल्प दीर्घकाळ रखडले. दरपत्रकातील बदल, जमिनीच्या किमतीत झालेली वाढ, आराखडा व कामांची व्याप्ती यातील बदलांमुळे सर्व प्रकल्पांच्या किमतीत लक्षणीय वाढ झाली.

**(परिच्छेद 2.1.2; पृष्ठ 12 आणि परिच्छेद 2.1.3; पृष्ठ 13)**

- तीन प्रकल्पांमध्ये, अव्यवहार्य लाभ व्यय गुणोत्तर असूनही सुधारित मंजुरी देण्यात आली.

**(परिच्छेद 2.2.1; पृष्ठ 16)**

- सिंचन क्षमता निर्मितीचे उद्दिष्ट सहा पैकी एकाही प्रकल्पात गाठता आले नाही आणि सिंचन क्षमतेची अंदाजित व प्रत्यक्ष निर्मिती यामधील फरक 3.20 ते 43.56 टक्के इतका होता. 2014-15 ते 2020-2021 या कालावधीत प्रत्यक्षात तयार केलेल्या सिंचन क्षमतेचा वापर शून्य ते 85.94 टक्के होता.

**(परिच्छेद 2.2.2; पृष्ठ 17)**

- सर्व सहा प्रकल्पांमध्ये, तीनही हंगामात लक्ष्यित क्षेत्राच्या सिंचनात कमतरता होती. सर्व हंगामात या प्रकल्पांच्या लाभक्षेत्रामधील लागवड त्यांच्या सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये उल्लेखीत केल्याप्रमाणे नव्हती.

**(परिच्छेद 2.2.3; पृष्ठ 20)**

- निवडक प्रकल्पांच्या लाभक्षेत्राखालील वास्तविक पीक पद्धती ही सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये प्रस्तावित पिकांची विविधता आणि लागवडीयोग्य क्षेत्रांपेक्षा भिन्न होती.

**(परिच्छेद 2.2.4; पृष्ठ 21)**

- कृषी उत्पादनाच्या अंदाजित आणि प्रत्यक्ष मूल्यामध्ये तफावत होती. सविस्तर प्रकल्प अहवालातील नियोजनानुसार सिंचनाच्या अभावामुळे पीक उत्पादन वाढवता आले नाही.

**(परिच्छेद 2.2.5; पृष्ठ 24)**

- कालवा प्रणालीच्या भौतिक तपासणी दरम्यान, सहा पैकी दोन प्रकल्पांत (आंधळी आणि वाघोलीबुटी उपसा सिंचन योजना) संबंधित व्यवस्थापन विभागांची देखभाल निकृष्ट असल्याचे आढळून आले.

**(परिच्छेद 3.1.2; पृष्ठ 30)**

- आंधळी, पिंपळगाव (ढाले) आणि वाघोलीबुटी प्रकल्पातील 12 गावांतील केलेल्या सर्वेक्षणानुसार या कालावधीत 66 शेतकऱ्यांना कालव्याद्वारे पाणी दिले गेले नाही. तसेच, हरणघाट आणि सोंड्याटोला प्रकल्पातील 16 गावांतील 53 शेतकऱ्यांना फक्त खरीप हंगामात कालव्याद्वारे पाणी देण्यात आले.

**(परिच्छेद 3.2.1; पृष्ठ 32)**

- पाणी वापर संस्थांची निर्मिती न करणे/निष्क्रियता यामुळे शेतकऱ्यांचे सहभागी सिंचन व्यवस्थापनाचे उद्दिष्ट असफल राहिले.

**(परिच्छेद 3.2.2; पृष्ठ 33)**

- वर्ष 2020-21 च्या अखेरीस, ₹ 7.67 कोटी पाणी उपकर थकित होता.

**(परिच्छेद 3.3.1; पृष्ठ 37)**

***शिफारशी***

- ***शासनाने केंद्रीय जल आयोगाकडून प्रकल्पांची पूर्व मंजुरी सुनिश्चित करावी.***
- ***राज्यातील अवर्षणग्रस्त भाग पाण्यापासून वंचित राहू नये, उपसा सिंचनाचे नियोजन करणे आणि पाण्याचे योग्य वितरण सुनिश्चित करण्यासाठी शासनाने प्रकल्प व्यवस्थापनात सुधारणा करावी.***
- ***प्रकल्पांचे नियोजन आणि अंमलबजावणी अशा रीतीने करावी की ते वेळेत आणि अंदाजित खर्चात पूर्ण होतील आणि खर्च वाढून विलंब झालेले प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावेत.***
- ***कालवा प्रणाली/प्रतिबंधात्मक कामांच्या देखभालीला प्राधान्य देऊन अपेक्षित सिंचन क्षमता साध्य केली जावी.***
- ***शासनाने सिंचन प्रकल्पांमध्ये नमूद केल्यानुसार पीक पद्धतीमध्ये आवश्यक बदल घडवून आणण्यासाठी, नियोजन आणि अंमलबजावणी करतांना, जलसंपदा विभाग आणि कृषी विभाग यांच्यात समन्वय साधावा.***
- ***शासनाने हे सुनिश्चित करावे की प्रकल्पांना मंजूरी देण्यापूर्वी योग्य सर्वेक्षण केले गेले आहे जेणेकरुन अपेक्षित लाभार्थ्यांना वेळेत आणि किफायतशीर पद्धतीने लाभ मिळतील.***
- ***शासनाने प्रकल्पांच्या पंपिंग मशिनरी आणि कालवा प्रणालींची त्वरित आणि प्रभावी देखभाल सुनिश्चित करावी.***

- ***विविध स्तरांवर पाणी वापर संस्था, कालवा सल्लागार समित्या आणि समन्वय समित्या स्थापन करून सहभागी सिंचन व्यवस्थापन उपक्रमांची खात्री करावी.***
- ***प्रकल्पांच्या लाभार्थ्यांकडून पाणी उपकर वसुली सुव्यवस्थित करणे आवश्यक आहे आणि त्याचा वापर देखभालीसाठी करावा.***